**7.1.11 Institution celebrates/organizes national and international commemorative days, events and festivals:**

To inculcate and nurture the principles like Sacrifice, Dedication, Devotion, Struggle, Patriotism, Equality, Nationality, Brotherhood, Humanity, the college organizes number of programs in college. Celebration of National festivals *Independence Day* and *Republic Day* imbibe these principles among students. Such activities inspire the minds of the youth and also create awareness in them according to the changing global scenario as well. The college organizes Marathon on 20th December every year to celebrate the death anniversary of Aacharya Bapusaheb Gajananrao Garud (Ex. Deputy Speaker of Maharashtra Legislative Assembly). It teaches us dedication and sacrifice towards the education of downtrodden and economically deprived community through the saga of Aacharya Bapusaheb's life and works. Voters' awareness, environment awareness, road safety programmes is organized by the college. The NSS volunteers and play a major role in these activities.

Every year college celebrates birth and death anniversaries of epoch-making personalities Chhatrapati Shivaji Maharaj Birth Anniversary, Mahatma Gandhi, Lokmanya Tilak, Mahatma Jyotiba Phule, Chhatrapati Rajashri Shahu Maharasj (Social Justice Day) Dr. Babasaheb Ambedkar, Pandit Jawaharlal Nehru, Dr. Radhakrishnan (Teachers Day),

Savitribai Phule, Indira Gandhi, Sardar Vallabhbhai Patel, Sanvidhan Divas, Yoga Day, Kranti Day, World Aids Day, Dr. A.P.J. Abdul Kalam, National Youth Day, Journalist Day, Womens Day, and others. These celebrations help to inspire our students and also to make public awareness through social issues.

THE SHENDURNI SECONDARY EDUCATION CO.OP SOC. LTD. A.R.B.GARUD ART'S COMM. & SCIENCE COLLEGE SHENDURNI TAL-JAMNER DIST-JALGAON

**Seal and Sign**

PRINCIPAL
Appasaheb R.B.Garud Art's
Commerce & Science College,
Shendurni- 424204 Tal-Jamner
Dist- Jalgaon (M.S.)

**Annual Report of the Celebrations and Commemorative events**

**Academic Year 2014-2015**



*Mahatma Gandhi Jayanti Celebration 2nd October 2014*



*Chhatrapati Shivaji Maharaj Jayanti Celebration 19th Feb.2015*

2016-15

Since 1971

*The Shendurni Secondary Education Co-op Society's*

**APPASAHEB R.B. GARUD ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, SHENDURNI, TAL- JAMNER, DIST- JALGAON (424204)**

अप्पासाहेब र. भा. गरुड कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, शेंदुर्णी ता.जामनेर,जि.जळगाव (४२४२०४)

Affiliated to North Maharashtra University | NAAC Re-Accredited 'B' Grade (2.58) | ISO - 9001:2008 Certified

PRINCIPAL Dr.K.V.Patil (M.Com.,M.Phil.,Ph.D) | (02580)252246 ,Fax: 252870

www.arbgarudcollege.ac.in E-mail: garudcollege@gmail.com

Outward No./ जावक क्र.

Date / दिनांक: 19/02/2015

## गरुड महाविद्यालयात शिवजयंती साजरी

शेंदुर्णी: दि.19.2.2015: अ.र.भा. गरुड कला, वाणीज्य व विज्ञान महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के.व्ही. पाटील यांच्या हस्ते महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रा. एन. एस. सावळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्राचार्य सरांनी 'महाराजांचे जीवन व कार्य' याविषयावर मार्गदर्शन केले.

याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

Principal
A.R.B.Garud Arts, Commerce, Vanijya & Vidnyan Mahavidyalaya, Shendurni

*Chhatrapati Shivaji Maharaj Jayanti Celebration Report 19th Feb.2015*

**Seal and Sign**

THE SHENDURNI SECONDARY EDUCATION CO-OP SOC. LTD. A.R.B. GARUD ART'S COMM. & SCIENCE COLLEGE SHENDURNI TAL-JAMNER DIST-JALGAON

PRINCIPAL
Appasaheb R.B.Garud Art's
Commerce & Science College,
Shendurni- 424204 Tal-Jamner
Dist- Jalgaon (M.S.)

**Annual Report of the Celebrations and Commemorative events**

**Academic Year 2015-2016**

Report on 14th April Dr.Babasahaeb Ambedkar Birth Anniversary 2015-2016

**अ.र.भा. गरुड कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर रौप्य महोत्सवानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांचा संक्षिप्त अहवाल :-**

शेंदुर्णी, दि. २३.०१.१६ रोजी महाविद्यालयात 'डॉ. बाबासाहेब आंवेडकरांचे जीवन, कार्य आणि विचार' या विषयावर आधारित निबंध स्पर्धा घेण्यात आली. त्यात एकूण सतरा विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी डॉ. वावासाहेव आंबेडकरांचे

दि. ०८.०२.२०१६ रोजी अ.र.भा. गरुड कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात आयोजित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर रौप्य महोत्सवानिमित्त प्रा. देवेन्द्रजी इंगळे (इतिहास विभाग, एम.जे.महाविद्यालय, जळगाव) यांचे **"भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर: युगप्रवर्तक नेतृत्व"** या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी आपल्या व्याख्यानात घटनात्मक नैतिकता पाळण्याची तसेच संविधानिक मार्गाने लढा देण्याची आवश्यकता आहे. लोकशाही ही चौकट नसून भारतीय समाज लोकशाही समाज बनवण्याची पद्धत आहे. भारतात असणारी बहुविधता हीच भारताची ताकद आहे. समस्त शोषितांच्या, उपेक्षितांच्या कल्याणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आवाज उठवून त्यांना न्याय मिळवून दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के.व्ही. पाटील होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमा पूजनाने झाली. प्रास्ताविक प्रा.अमर जावळे (रा.से.यो.कार्यक्रमअधिकारी) यांनी तर व्याख्यात्यांचा परिचय प्रा.एन.एस. सावळे यांनी केला. सुत्रसंचालन प्रा. योगिता चौधरी रा.से.यो.महिला कार्यक्रम अधिकारी ) यांनी केले. तर आभार प्रा.निरुपमा वानखेडे

यांनी मानले. याप्रसंगी प्रा. वसंत पतंगे (विद्यार्थी कल्याण अधिकारी) ,प्रा.आर.डी.गवारे (रा.से.यो.सहायक कार्यक्रम अधिकारी) तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद तसेच विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

दि. ०७.०४.२०१६ रोजी गरुड महाविद्यालय व समाजकल्याण विभाग जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात प्रा.संजय भोळे यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक व राजकीय विचारांवर प्रकाश टाकला.

दि. १४ एप्रिल २०१६ रोजी महाविद्यालयात महामानव 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' यांची १२५ वी जयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम प्रतिमापूजन करण्यात आले. प्रा.आर.डी. गवारे यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर: जीवन व कार्य' या विषयावर व्याख्यान दिले. ते म्हणाले की, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्व सांगितले. तसेच शेती प्रश्नांविषयी विविध समस्यांवर उपाययोजना देखील सांगितल्या पण त्यावर राज्यकर्त्यांना योग्यप्रकारे अंमलबजावणी करता आली नाही. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक तसेच शिक्षकेतर वृंद उपस्थित होते.

अशाप्रकारे महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

प्राचार्य
PRINCIPAL
Appasaheb R.B.Garud Art's
Commerce & Science College,
Shendurni- 424204 Tal-Jamner

anned with CamScanner




# संविधानिक मार्गाने लढा देण्याची आवश्यकता

## प्रा. इंगळे यांचे प्रतिपादन; शतकोत्तर रौप्य महोत्सवीनिमित्त व्याख्यान

। शेंदुर्णी प्रतिनिधी ।

आज घटनात्मक नैतिकता पाळण्याची तसेच संविधानिक मार्गाने लढा देण्याची आवश्यकता आहे. लोकशाही ही चौकट नसून भारतीय समाज लोकशाही समाज बनविण्याची पद्धत आहे. बहुविपता हीच आपली ताकद आहे. समस्त शोषितांच्या कल्याणासाठी आंबेडकरांनी आवाज उठविला. आज आपणही आपली मते व्यक्त करायला पाहिजे, असे प्रतिपादन प्रा.देवेंद्र इंगळे यांनी केले.



» अ.र.भा. गरूड महाविद्यालयात ८ रोजी डॉ. आंबेडकरांच्या विचारांची प्रासंगीकता या विषयावर व्याख्यानाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी इंगळे पूढे म्हणाले की, विज्ञानवाद, मानवता, अहिंसा, समानता, बंधुता, समता, लोकशाही इत्यादीतून आधुनिकता निर्माण होते. आज जगाला आंबेडकरांच्या विचारांची गरज आहे. असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.के.व्ही. पाटील होते. प्रास्ताविक प्रा.अमर जावळे, परिचय प्रा.एन.एस. सावळे, सूत्रसंचालन प्रा. योगिता चौधरी तर आभार प्रा. निरूपमा वानखेडे यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

*News Coverage of 14th April, Dr. Babasahaeb Ambedkar Birth Anniversary 2015-2016*

# डॉ.आंबेडकर रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त शेंदूर्णीत व्याख्यान

**शेंदूर्णी (प्रतिनिधी)–**

अ.र.भा गरुड महाविद्यालयात देवेंद्र इंगळे (एम. जे. महाविद्यालय, जळगांव) यांचे डॉ.आंबेडकरांच्या विचारांची प्रासंगिकता या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. ते म्हणाले की आज घटनात्मक नैतिकता पाळण्याची तसेच संविधानिक मार्गाने लढा देण्याची आवश्यकता आहे. लोकशाही ही चौकट नसून भारतीय समाज लोकशाही समाज बनवण्याची पद्धत आहे. बहुविधता हीच आपली ताकद आहे. समस्त शोषितांच्या कल्याणासाठी आंबेडकरांनी आवाज उठविला. आज आपणही आपली मते व्यक्त करायला पाहिजे. विज्ञानवाद, मानवता, अहिंसा, समानता, बंधुता, समता, लोकशाही इत्यादीतून आधुनिकता निर्माण होते. आज जगाला आंबेडकरांच्या विचारांची गरज आहे. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.के.व्ही. पाटील होते. प्रास्ताविक प्रा.अमर जावळे, परिचय प्रा. एन.एस. सावळे, सूत्रसंचालन प्रा.योगिता चौधरी तर आभार प्रा. निरुपमा वानखेडे यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गरुड विद्यालयात डॉ. आंबेडकर साजरी



शेंदुर्णी : [illegible]

*News Coverage of 14th Aptil Dr.Babasahaeb Ambedkar Jayanti 2015-2016*

Report on 21st February Maitri Bhasha Din, 2015-2016

**अ.र.भा. गरुड कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात मैत्री भाषा दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचा संक्षिप्त अहवाल :-**

शेंदुर्णी, दि. ०२१.०२.२०१६ अ.र.भा. गरुड कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात मैत्री भाषा दिवस साजरा करण्यात आला. यानिमित महाविद्यालयात 'भाषा भगिनी: मराठी, हिंदी इंग्रजी' या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. प्रा.आर.डी.गवारे(हिंदी विभाग प्रमुख) यांचे 'भाषा मैत्री' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले की, भाषा ही संस्कृती तसेच विचारांची वाहक असते. तसेच भाषेच्या माध्यमातून साहित्य लिहिल्या जाते. साहित्यातून समाजाचे चित्रण होत असते. प्रत्येक भाषा ही महत्वाची असते. भाषेच्या माध्यमातूनच विविध क्षेत्रातील ज्ञान ग्रहण करता येते. व्यक्तीचे व्यक्तिमत्व विकसित करण्यामागे भाषेची भूमिका ही महत्वपूर्ण असते. म्हणून प्रत्येक भाषेवर प्रेम करावे. आज कित्येक भाषेतील ज्ञान भाषां तराच्या माध्यमातून जगासमोर येऊ शकते. म्हणून आज कमीत कमी दोन भाषा चांगल्या प्रकारे आल्या पाहिजे. सर्व भाषा या भगिनी आहेत म्हणून मैत्रीपूर्ण दृष्टीने त्यांचा अभ्यास करून त्या अवगत केल्या पाहिजे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के.व्ही. पाटील होते. प्रास्ताविक प्रा. वसंत पतंगे (विद्यार्थी कल्याण अधिकारी) यांनी केले. सुत्रसंचालन प्रा.भूषण पाटील(मराठी विभाग प्रमुख) यांनी तर आभार प्रा. दिनेश पाटील(इंग्रजीविभाग) यांनी मानले. प्रा.अमर जावळे यांनी भूमिका विशद केली. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी वृंद तसेच विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

Principal
Appasaheb R.B.Garud Arts
Commerce & Science College
Shendurni-424204,Tal-Jamner

2015-16

मैत्री भाषा दिनानिमित्त आयोजित व्याख्यानाची छायाचित्रे.



व्याख्यान देताना प्रा.आर.डी.गवारे

Scanned with CamScanner

*News Coverage of 21st February Maitri Bhasaha Din 2015-2016*

**Seal and Sign**

PRINCIPAL
Appasaheb R.B.Garud Art's
Commerce & Science College,
Shendurni- 424204 Tal-Jamner
Dist- Jalgaon (M.S.)

**Annual Report of the Celebrations and Commemorative events**

**Academic Year 2016-2017**

Report on International Yoga Day 21st June, 2016-2017

(S) . 2016-17

दि. २२ जुन २०१६.

शेंदुर्णी :- अ. र. भा. गरुड महाविद्यालयात 'योग दिवस' साजरा.

दि. २१ जुन २०१६ रोजी अ. र. भा. गरुड महाविद्यालयात
प्राचार्य डॉ. के. वी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली
योग दिवस साजरा करण्यात आला. त्यांनी आपल्या
भाषणात योगाचे महत्व सांगतांना आजच्या धका-
धकीचे जीवन जगत असतांना योगाची किती
आवश्यकता आहे हे स्पष्ट केले. विविध प्रकारच्या
योगासनांचे प्रात्याक्षिकांद्वारे महत्व सांगितले. याप्रसंगी
महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर
वृंद उपस्थित होते.

प्रा. एस. जी. डेरस्कर व प्रा. आर. जी. पाटील
यांनी विविध आसनांचे प्रात्यक्षिक सर्वांकडून
करून घेतले. एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी
प्रा. आर. डी. गवारे यांनी आभार मानले.

SENIOR

*Principal*
Appasaheb R.B.Garud Art
Commerce & Science Colle
Shendurni-424204,Tal.Jam

THE SHENDURNI SECONDARY EDUCATION CO-OP SOC. LTD.
GARUD ARTS COMM. & SCIENCE COLLEGE
SHENDURNI
TAL-JAMNER
DIST-JALGAON





Report on World Population Day 11th July, 2016-2017

सकाळ
जळगाव, मंगळवार,
१२ जुलै २०१६

2016-17
N.S.S.

# गरुड महाविद्यालयात जागतिक लोकसंख्या दिन

शेंदुर्णी (ता. जामनेर), ता. ११ : येथील अ. र.भा गरुड महाविद्यालयात आज जागतिक लोकसंख्या दिवस प्रा. एन. एस. सावळे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

प्रा. ए. एन. जिवरग यांनी किशोरवयीन तरुणींचा सर्वांगीण विकास या विषयावर मुलींना येणाऱ्या तसेच शिक्षणाविषयक समस्यांबाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे आयोजन एनएसएस व विद्यार्थी कल्याण विभाग यांच्या वतीने करण्यात आले होते.

याप्रसंगी एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा. आर. डी. गवारे, विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. व्ही. एन. पतंगे तसेच सहाय्यक महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. योगीता चौधरी, प्रा. डॉ. संजय भोळे, प्रा. अमर जावळे, प्रा. भुषण पाटील, प्रा. महेश पाटील, प्रा.रिना गरुड, प्रा. देशमुख, प्रा. वानखेडे तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रा. एस. जी. डेहरकर यांनी सुत्रसंचालन केले. सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. दिनेश पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमाला मोठी उपस्थिती लाभली.




शेंदुर्णी : गरुड विद्यालयात जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमप्रसंगी प्रा. ए. एन. जिवरग आदी.

दै. सकाळ - दि.12 जुलै 16

Programme Officer / Principal
N.S.S.
A.R.B.Garud Kala.Wanijya & Vidnyan Mahavidyala,
Shendurni.Tal.Jamner.Dist.Jalgaon

Report on NSS Day 25th September, 2016-2017

SHENDURNI SECONDARY EDUCATION CO-OP SOC. LTD.
A.R.B.GARUD ARTS COMM. & SCIENCE COLLEGE
SHENDURNI
TAL-JAMNER DIST-JALGAON






# स्वयंसेवकांनी समाजातील समस्या दूर कराव्यात

## शेंदुर्णी येथील गरुड महाविद्यालयात प्रा. अमर जावळे यांचे प्रतिपादन

। शेंदूर्णी प्रतिनिधी ।

समजामध्ये खुप समस्या आहेत. त्या दूर करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनाच्या माध्यमातून विविध उपक्रमांद्वारे स्वयंसेवकांनी भाग घेवून सेवा करावी असे प्रतिपादन प्रा. अमर जावळे यांनी केले. ते अ. र. भा. गरूड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजनेचा स्थापना दिवस साजरा करण्यात आला त्याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना : समाजसेवेचे प्रभावी माध्यम या विषयावर व्याख्यान देत होते. यावेळी प्रा. व्ही. एन. पतगे, प्रा. पी. जे. सोनवणे, प्रा. दिनेश पाटील, प्रा. योगिता चौधरी, प्रा. संदीप कुंभार आदी उपस्थित होते.

» प्रा. जावळे यांनी पुढे सांगितले की, सीमेवर जवान आपल्या प्राणांची आहुती देवून आपले रक्षण करीत आहे आपणही आपली जबाबदारी ओळखून समाजसेवेचे व्रत विद्यार्थी दशेपासून घ्यावे. जलसाक्षरता, पर्यावरण रक्षण, स्वच्छता, स्त्री भ्रूण हत्या आदी विषयांवर प्रबोधन करण्याचे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय भोळे होते. प्रास्तविक प्रा. आर. डी. गवारे यांनी केले तर आभार प्रा. आर. जी. पाटील यांनी मानले.

# गरुड महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस उत्साहात



**शेंदुर्णी, ता.जामनेर : प्रतिनिधी**

येथील अ.र.भा.गरुड कला वाणिज्य व विज्ञान महा. शेंदुर्णी येथे रासेयो स्थापना दिवस साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.संजय भोळे होते.

यावेळी प्रा.अमर जावळे (जिल्हा समन्वयक विद्यार्थी कल्याण) यांनी 'राष्ट्रीय सेवा योजना समाजसेवेचे प्रभावी माध्यम' या विषयावर व्याख्यान दिले. तसेच जलसाक्षरता, पर्यावरण रक्षण, स्वच्छता, स्त्रीभ्रूण हत्या इत्यादी विषयावर प्रबोधन करण्याचे आवाहनही त्यांनी केले. प्राचार्य डॉ.संजय भोळे यांनी रासेयोची उद्दिष्टे सांगितली. पूर्ण सप्ताहामध्ये पथनाट्य, रॅली, व्याख्याने, स्पर्धा घेणार असल्याचेही त्यांनी घोषित केले. याप्रसंगी विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा.व्ही. एन.पतंगे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.पी.जे.सोनवणे, प्रा.दिनेश पाटील(सहा. कार्य अधिकारी वरिष्ठ) प्रा.योगिता चौधरी(महिला कार्य अधिकारी), प्रा.संदिप कुंभार शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविक प्रा.आर. डी.गवारे (रा.से.यो कार्यक्रम अधिकारी) यांनी केले. आभार प्रा.आर.जी.पाटील यांनी मानले. मनिषा शिंपी ह्या विद्यार्थीनीने एनएसएस गीत सादर केले.

News coverage on NSS Day 25th September, 2016-2017

**Seal and Sign**

PRINCIPAL
Appasaheb R.B.Garud Art's
Commerce & Science College,
Shendurni- 424204 Tal-Jamner
Dist- Jalgaon (M.S.)

**Annual Report of the Celebrations and Commemorative events**

**Academic Year 2017-2018**

Report and News coverage on World Population Day 11th July, 2016-2017

THE SHENDURNI SECONDARY EDUCATION CO-OP SOC. LTD. A.R.P. GARUD ARTS COMM. & SCIENCE COLLEGE SHENDURNI TAL-JAMNER DIST-JALGAON

दै. लोकमत - हॅलो जळगाव पान नं 1 दि. 12/07/2017

आंतरमशागतीची कामे पूर्ण झाली … लावून बसला आहे … प्रतीक्षा करीत आहेत.

# लोकसंख्या वाढ प्रगतीसाठी चिंताजनक

## शेंदुर्णी : लोकसंख्या दिनानिमित्त अमर जावळे यांचे व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**शेंदुर्णी** : लोकसंख्या वाढ हा देशाच्या प्रगतीसाठी चिंताजनक विषय असल्याचे अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. अमर जावळे यांनी सांगितले.

गरुड महाविद्यालयात जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त भूगोल आणि अर्थशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना एककच्या वतीने कार्यक्रम घेण्यात आला. त्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य एन.एस. सावळे होते.

कुटुंबातील संख्या वाढली की शैक्षणिक, आरोग्य व इतर खर्चही वाढतात. त्यातून कुटुंबाला आर्थिक समस्या भेडसावतात. अशी कुटुंबाची वाढलेली लोकसंख्या कुटुंबापुरती मर्यादित न राहता गाव, जिल्हा व राज्याची समस्या लोकसंख्येच्या वाढीमुळे प्रगतीचा वेग मंदावतो. लोकसंख्या वाढ हा चिंताजनक विषय असून, देशाचा जीडीपी त्यामुळे प्रभावित झाला आहे, असेही जावळे यांनी सांगितले.

दीपक जाधव, शेंदुर्णी



**शेंदुर्णी येथे प्रा. अमर जावळे मनोगत व्यक्त करताना. व्यासपीठावर आर.जी. पाटील, एन.एस. सावळे, प्रा.व्ही.एन.पतंगे आदी.**

प्राध्यापिका एन.बी.वानखेडे, स्वयंसेवक जयेश शिंपी, उपप्राचार्य प्रा.आर.जी. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय मनोगतात उपप्राचार्य सावळे म्हणाले, देशाचा विकास करण्यासाठी राज्ये समृद्ध हवी. राज्य समृद्धीसाठी कुटुंबाचा कणा चांगला हवा. कुटुंबाचा आर्थिक पाया व आरोग्याचा कळस चांगला असला की, कुटुंबाचे मंदिर छोटे व सुंदर लाभते.

सूत्रसंचालन प्रा.एस.जी.डेहरकर यांनी, तर प्रा.रिना पाटील यांनी आभार मानले.

उपप्राचार्य प्रा.आर.जी पाटील, भूगोल विभागप्रमुख प्रा.ए.एन. जिवरग, विशेष कार्यक्रम अधिकारी प्रा.व्ही. एन.पतंगे, सेवायोजन कार्यक्रम अधिकारी प्रा.आर.डी.गवारे, प्रा.भूषण पाटील, प्रा.सुजाता पाटील, प्रा.योगिता चौधरी, प्रा.संदीप कुंभार, प्रा.दीपक पाटील, प्रा.छाया पाटील, प्रा. महेश पाटील, प्रा. वर्षा लोखंडे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

---

दैनिक **सत्यमय**

# गरुड महाविद्यालयात जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त व्याख्यान संपन्न

**शेंदुर्णी (प्रतिनिधी)** : येथील गरुड महाविद्यालयात जागतिक लोक संख्या दिनानिमित्त भूगोल आणि अर्थशास्त्र विभाग व रासेयो एकक कनिष्ठ व वरीष्ठ विभागाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.अमर जावळे यांचे व्याख्यान मार्गदर्शक ठरले. ते म्हणाले लोकसंख्यावाढ हा चिंताजनक विषय असून देशाचा जीडीपी त्यामुळे प्रभावीत झाला आहे. प्रा.एन.बी. वानखेडे मॅडम, स्वयंसेवक जयेश शिंपी, उपप्राचार्य प्रा.आर.जी. पाटील यांनी मनोगते व्यक्त केलीत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा.एन. एस.सावळे हे होते. लोकसंख्या नियंत्रणाची गरज अध्यक्षीय समारो पातून विषद केली. सूत्रसंचालन प्रा.एस.जी. डेहरकर व आभार प्रा.सौ.रिना पाटील, उपप्राचार्य प्रा.आर.जी. पाटील, भूगोल विभाग प्रमुख प्रा.ए.एन.जिवरग, वि.क. अधिकारी प्रा.व्ही.एन.पतंगे से यो कार्यक्रम अधिकारी प्रा.आर.डी. गवारे, प्रा.भूषण पाटील, प्रा.सुजाता पाटील, प्रा.योगीता चौधरी, प्रा.संदीप कुंभार, प्रा.दिपक पाटील, प्रा.सौ. छाया पाटील, प्रा.सौ. वर्षा लोखंडे प्राध्यापक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.



Report on National Integration Day celebration on 31st October 2017

दि. 02/11/2017. (1)

अ. र. भा. गरुड कला, वाणीज्य व विज्ञान महाविद्यालय
शेंदुर्णी ता. जामनेर जि. जळगाव

वरिष्ठ

## राष्ट्रीय एकता दिवस अहवाल

शेंदुर्णी: दि. 31/10/17 रोजी येथील अ. र. भा. गरुड कला,
वाणीज्य व विज्ञान महाविद्यालयात सरदार वल्लभभाई
पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून
साजरा करण्यात आली. भारताच्या पहिल्या महिला
पंतप्रधान स्वर्गीय इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त
अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी प्रा. डॉ. प्रशांत देशमुख यांनी सरदार
पटेल यांच्या जीवन व कार्याचा वेध आपल्या व्याख्या-
नातून घेतला. 565 संस्थाने विलीनीकरण करून
घेण्याचे काम त्यांनी केले. त्यांना आधुनिक प्रशासन
सेवेचे जनक देखील सरदार पटेल यांना मानले जाते.

अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. वासुदेव पाटील यांनी सांगितले की, सरदार पटेल हे
बालपणापासून कणखर, मेहनती व लोखंडासारखे
कडक होते. म्हणून त्यांना 'लोहपुरुष' म्हणतात.
मूर्तिमंत प्रेरणा, धाडस, आत्मविश्वास आणि बळ
म्हणजे सरदार पटेल. सरदार पटेलांचे महत्वाचे
गुण म्हणजे स्पष्ट दृष्टिकोन, ठाम निश्चय आणि
कुठल्याही परिस्थितीत न बदलणारी इच्छाशक्ती.

CS Scanned with CamScanner

या प्रसंगी ग्रंथालयामार्फत सरदार पटेल व इंदिरा गांधी यांच्या जीवनावरील पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंदिरा गांधी संशोधन केंद्राचे समन्वयक प्रा. भूषण पाटील यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. आर. डी. गवारे यांनी सूत्रसंचालन केले. ग्रंथपाल प्रा. डी. एच. धारगावे यांनी आभार मानले. शेवटी राष्ट्रीय एकतेची शपथ घेण्यात आली.

कार्यक्रमाला सर्व शिक्षक, शिक्षकेतर वृंद व विद्यार्थी स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PRINCIPAL
Appasaheb R.B.Garud Art's
Commerce & Science College,
Shendurni- 424204 Tal-Jamner



# गरुड महाविद्यालयात राष्ट्रीय एकता दिवस उत्साहात

**शेंदुर्णी, ता.जामनेर : वार्ताहर**

येथील गरुड महाविद्यालयात सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करण्यात आली. तसेच भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान स्व.इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.वासुदेव पाटील होते.

यावेळी प्रा.डॉ. प्रशांत देशमुख यांनी सरदार पटेल यांच्या जीवनकार्याविषयी आपल्या व्याख्यानातून घेतला. ५६५ संस्थाने विलनीकरण करुन घेण्याचे महान कार्य सरदार पटेलांनी केले. तसेच आधुनिक प्रशासन सेवेचे जनक देखील सरदार पटेल यांना मानले जाते, असेही त्यांनी स्पष्ट केले. कनिष्ठ महाविद्यालयातील रासेयो समन्वयक प्रा. पी.जे. सोनवणे यांनी इंदिरा गांधी यांच्या जीवनकार्याविषयी माहिती दिली. माजी विद्यार्थी संघाचे प्रतिनिधी रवी गुजर यानीही मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ.वासुदेव पाटील यांच्या अध्यक्षीय समारोपाने कार्यक्रमाची सांगता झाली.

इंदिरा गांधी केंद्र व सरदार पटेल केंद्र तसेच राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले होते. याचा विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. सरला गरुड यांच्याहस्ते मोनिका राठोड या विद्यार्थिनीस आर्थिक मदत देण्यात आली. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.भूषण पाटील, सूत्रसंचालन प्रा.आर.डी.गवारे यांनी केले.

News coverage on National Integration Day, 31st October, 2017-2018

**Seal and Sign**

PRINCIPAL
Appasaheb R.B.Garud Art's
Commerce & Science College,
Shendurni- 424204 Tal-Jamner
Dist- Jalgaon (M.S.)

**Annual Report of the Celebrations and Commemorative events**

**Academic Year 2018-2019**

Report and News Coverage on International Yoga Day celebration on 21st June 2018


जनशक्ति

9/10

तंदुरुस्त शरीरासह, प्रसन्न मनासाठी योग महत्वाचा; मान्यवरांचे मार्गदर्शन

# जिल्हाभरातील शाळा, महाविद्यालयांमध्ये योगाचे धडे!

शिक्षक, विद्यार्थ्यांचा उस्फूर्त सहभाग; विद्यार्थ्यांनी सादर केली प्रात्यक्षिके

जळगाव । चौथा आंतरराष्ट्रीय योग दिवस आज सर्वत्र मोठ्या उत्साहात पार पडला. त्या पार्श्वभूमीवर जिल्हाभरातील शाळा, महाविद्यालयांमध्ये योगाचे धडे देण्यात आले. या योग दिनाच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसह, शिक्षकांनी मोठा सहभाग नोंदविला. अनेक महाविद्यालयांमध्ये विविध प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. स्वस्थ आरोग्यासाठी, मानसिक प्रसन्नतेसाठी योग महत्वाचा असल्याचे मान्यवरांनी मार्गदर्शनात सांगितले.

**न्यू व्हिजन इंग्लिश मिडीयम स्कूल**

**ललवाणी विद्यालय**

**अप्पासाहेब गरुड महाविद्यालय**

**धानोरा विद्यालय**



Report and News Coverage Kranti Diwas celebration on 9th August 2018

THE SHENDURNI SECONDARY EDUCATION CO-OP SOC. LTD.
A.R.B. GARUD ARTS, COMM. & SCIENCE COLLEGE
SHENDURNI
TAL-JAMNER
DIST-JALGAON

जळगाव
तरुण भारत

# गरूड महाविद्यालयात क्रांती दिन साजरा




**तभा वृत्तसेवा**

**शेंदुर्णी,ता.जामनेर, ११ ऑगस्ट**

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना आणि इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांती दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ.प्रशांत देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

तसेच ग्रंथालय प्रमुख धम्मा एच. धारगावे यांनी डॉ. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथालयाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. याप्रसंगी राहुल पाटील आणि मनीषा नाईक या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. आर. पाटील होते. त्यांनी विद्यार्थ्यांना पुस्तकाच्या सानिध्यात राहावे असा संदेश दिला. तसेच या प्रसंगी ग्रंथालयातील पुस्तकांचे प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रास्ताविक डॉ. रोहिदास गवारे यांनी केले.

सूत्रसंचालन काजल चव्हाण हिने केले. याप्रसंगी उपप्राचार्य एन.एस.सावळे, उपप्राचार्य आर. जी.पाटील, डॉ. संजय भोळे, डॉ. श्याम साळुंखे, डॉ. वसंत पतंगे, प्रा. दिनेश पाटील, प्रा. ए. एन.जिवरग, प्रा.अमर जावळे, प्रा. निरुपमा वानखेडे, डॉ. सुजाता पाटील, प्रा. महेश पाटील, प्रा.एस.जी देहरकर, डॉ. योगिता चौधरी, प्रा. संदीप कुंभार आणि विद्यार्थी उपस्थित होते. आभार शुभांगी बारी यांनी मानले.

Report and News Coverage National Youth Day and Rashtramata Jijau Birth Anniversary celebration on 12th January 2019

View Article
epaper.esakal.com

छायाचित्रात चुंचाळे (ता. यावल) येथे जिल्हा परिषद शाळेत प्रतिमापूजन करताना शिक्षक मंजित तडवी, राहुल वा

# जिजाऊ, स्वामी विवेकानंदां

## ळ येथे रक्तदान; शेंदुर्णीत वक्तृत्व स्पर्धा; चुंचाळेला

देवाणघेवाण करावी, आपल्या बलस्थानांचा सुयोग्य व पुरेपूर वापर करावा असे प्रा. सुधीर ओझा म्हणाले.

प्राचार्य डॉ. आर. पी. सिंह, इंडियन रेड क्रॉस सोसायटीचे डॉ. पी. बी. जैन व डॉ. ए. डी. चौधरी, प्रा.अविनाश पाटील, प्रा. पंकज भंगाळे, डॉ. गिरीश कुलकर्णी, प्रा.अजित चौधरी, प्रा. दिनेश पाटील, प्रा. सुधाकर चौधरी उपस्थित होते. शिबिरासाठी प्रा. सचिन हरिमकर, प्रा. नितीन खंडारे, प्रा. धीरज पाटील, प्रा. राहुल चौधरी, प्रा. मनोज बडगुजर तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

**गरुड महाविद्यालय**

शेंदुर्णी (ता. जामनेर) : येथील अ. र. भा. गरुड महाविद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. या दोन्ही महापुरुषांच्या जीवनकार्यावर वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून प्रकाश टाकला. प्रा. ए. एन. जीवरग व प्रा. प्रमोद सोनावणे यांनी व्याख्यानातून प्रेरणादायी विचार मांडले. प्रा. जिवरग यांनी सांगितले की, स्वामी विवेकानंद यांच्या जीवनातून त्याग व निर्धार शिकावे, जिजाऊ माँसाहेबांनी शिवबा घडवताना कशाप्रकारे त्याग केला व जिजाऊ या संस्कारांचे विद्यापीठ होते, असे सांगितले.

प्राचार्य डॉ. वासुदेव पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात, महापुरुषांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन आपले जीवन कसे घडावे हा विचार विद्यार्थ्यांनी करावा असे सांगून याप्रसंगी स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचे वाचन विद्यार्थ्यांकडून करून घेतले. डॉ. आर. डी. गवारे यांनी सूत्रसंचालन व आभार केले. याप्रसंगी उपप्राचार्य एन. एस. सावळे, उपप्राचार्य आर. जी. पाटील व महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गरुड महाविद्यालय, शेंदुर्णी

**शेंदुर्णी** । येथील गरुड महाविद्यालयात स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली. या दोन्ही महापुरुषांच्या जीवन कार्यावर वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून प्रकाश टाकला प्रा ए.एन.जिवरग व प्रा. प्रमोद सोनावणे यांनी आपल्या व्याख्यानातून प्रेरणादायी विचार मांडले प्रा. जिवरग सरांनी सांगितले की स्वामी विवेकानंद यांच्या जीवनातून त्याग व निर्धार शिकावे, जिजाऊ मा साहेबानी शिवबा घडवताना कशाप्रकारे त्याग केला व जिजाऊ ह्या संस्कारांचे विद्यापीठ होते. असे प्रा. सोनावणे सरांनी सांगितले. प्राचार्य डॉ.वासुदेव पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की, महापुरुषासांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन आपले जीवन कसे घडावे, हा विचार विद्यार्थ्यांनी करावा. याप्रसंगी स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचे वाचन विद्यार्थ्यांकडून करून घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ.आर.डी.गवारे यांनी मानले. याप्रसंगी उपप्राचार्य एन.एस.सावळे उपप्राचार्य आर.जी.पाटील व महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

Report on 14th April Dr.Babasahaeb Ambedkar Birth Anniversary 2015-2016

2018-19

**गरुड महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन.**

वाचन संस्कृती विकसित करण्यायासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे हेच डॉ. बाबासाहेबांना खरे अभिवादन. --- प्राचार्य डॉ. वासुदेव पाटील

शेंदुर्णी दि. 06 डिसेंबर 2018 - राष्ट्रीय सेवा योजना एकक व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अ. र. भा. गरुड महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमत्त प्राचार्य डॉ वासुदेव पाटील यांनी डॉ. आंबेडकरांच्या जीवन संघर्ष प्रतिपादित केला. आजच्या काळात जो वाचन संस्कृतीचा ऱ्हास होत आहे तो चिंताजनक असून या पिढीने डॉ. आंबेडकरांच्या जीवनातून वाचन संस्कृतीचा धडा घेण्याचा सल्ला त्यांनी दिला. डॉ. प्रशांत एस. देशमुख यांनी डॉ. बाबासाहेब समजून घ्यायचे असतील तरी त्यांचा शिका, संघर्ष करा व संघटित करा हा विचार जीवनात स्वीकारा असे सांगितले. तृतीय वर्ष विज्ञान वर्गाची विद्यार्थिनी कु. योगिता गरुड हिने देखील मनोगत व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. आर. डी. गवारे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. रा. से. यो. सह कार्यक्रम अधिकारी प्रा. दिनेश पाटील यांनी आभार मानले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. आर. जी.पाटील,विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. वसंत पतंगे, डॉ. श्याम साळुंखे, डॉ. संजय भोळे, डॉ. आजिनाथ जीवरग, प्रा. महेश आर. पाटील, प्रा. धम्मा धारगावे, डॉ.योगिता चौधरी (रा.से. यो.सह महिला कार्यक्रम अधिकारी), प्रा. प्रमोद सोनवणे(कनिष्ठ रा.से.यो. एकक कार्यक्रम अधिकारी), प्रा.अप्पा महाजन, प्रा. श्रावण डेहरकर, प्रा. निरुपमा वानखेडे, श्री सतीष बाविस्कर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर वृंद उपस्थित होते.पवन गुजर,आकाश पाटील, पंकज बारी, शिवराज बारी या विद्यार्थ्यांचे सहकार्य मिळाले. कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



Programme Officer / Principal
N.S.S.
A.R.B.Garud Kala,Wanijya & Vidnyan Mahavidyalaya
Shendurni,Tal.Jamner,Dist.Jalgaon

ned with ... anner

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना एकक व विद्यार्थी विकास विभाग यांच्यातर्फे आयोजितमात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. वासुदेव पाटील यांनी डॉ. आंबेडकरांच्या जीवन संघर्ष प्रतिपादित केला. डॉ. प्रशांत एस. देशमुख यांनी डॉ. बाबासाहेब समजून घ्यायचे असतील तरी त्यांचा शिका, संघर्ष करा व संघटित करा हा विचार जीवनात स्वीकारा असे सांगितले. विद्यार्थिनी योगिता गरुड हिने देखील मनोगत व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. आर. डी. गवारे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. दिनेश पाटील यांनी आभार मानले. या वेळी उपप्राचार्य प्रा. आर. जी. पाटील, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. वसंत पतंगे, डॉ. श्याम साळुंखे, डॉ. संजय भोळे, डॉ. अजिनाथ जीवरग, प्रा. महेश आर. पाटील, प्रा. धम्मा धारगावे, डॉ.योगिता चौधरी, प्रा. प्रमोद सोनवणे, प्रा.अप्पा महाजन, प्रा. श्रावण डेहरकर, प्रा. निरुपमा वानखेडे, सतीश बाविस्कर उपस्थित होते. पवन गुजर, आकाश पाटील, पंकज बारी, शिवराज बारी विद्यार्थ्यांचे सहकार्य मिळाले.

E 5 PRO
MERA

News Coverage on Dr.Babasahaeb Ambedkar Birth Anniversary 2015-2016




THE SHENDURNI SECONDARY EDUCATION CO-OP SOC. LTD.
A.R.B.GARUD ART'S COMM. & SCIENCE COLLEGE
SHENDURNI
TAL-JAMNER
DIST-JALGAON

**Seal and Sign**

PRINCIPAL
Appasaheb R.B.Garud Art's
Commerce & Science College,
Shendurni- 424204 Tal-Jamner
Dist- Jalgaon (M.S.)